| **रे.मु.नं.५५०/२०२४ मधील निशाणी क्र.३१ खालील आदेश**<br>**(चांगदेव टकले व इतर वि. खंडू कोकरे व इतर)** | MHAH140009762024 |
| --- | --- |

सदरचा अर्ज प्रतिवादी क्र.४ ने त्याच्या विरुध्द झालेला एकतर्फा आदेश रद्द करुन कैफियत दाखल करण्यास परवानगी मिळणेबाबत दाखल केला आहे. प्रस्ततु अर्जासोबत प्रतिवादीचे शपथपत्र जोडलेले आहे.

२. प्रतिवादीने सदर अर्जात कथन केले आहे की, प्रतिवादी क्र. ४ यास दाव्यासंदर्भात काही महत्वाची कागदपत्रे व माहिती उपलब्ध न झाल्यामुळे प्रतिवादी क्र. ४ यास कोर्टात हजर राहून कैफियत दाखल करता आलेली नाही. त्यामुळे त्याच्याविरुध्द दावा एकतर्फा चालविण्याचा आदेश पारित केला. दावा हा स्थावर मिळकतीचा असल्याने प्रतिवादी क्र. ४ विरुध्द झालेला एकतर्फा आदेश रद्द होवून कैफियत दाखल न झाल्यास त्याचे कशानेही भरून न येणारे नुकसान होणार आहे. सबब, सदरचा अर्ज मंजुर करण्यात यावा.

३. वादीने सदर अर्जावर म्हणणे दाखल करुन कथन केले आहे की, सदरचा अर्ज व त्यामधील मजकुर वादींना मान्य व कबुल नाही. सबब, प्रतिवादीचा अर्ज नामंजूर करण्यात यावा.

४. सदरचा अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. उभय पक्षकारांचा युक्तीवाद ऐकला. प्रतिवादीने सदरील अर्जाच्या पृष्ठयर्थ नि.क्र.३२ वर शपथपत्र दाखल केले आहे. प्रतिवादीने प्रस्तुत अर्जास दिलेल्या कारणांच्या पुष्टयर्थ कोणताही कागदोपत्री पुरावा सादर केलेला नाही. प्रतिवादी क्र. ४ यास पुरेशी संधी देवून देखील तो वेळेवर न्यायालयात हजर राहिलेला नाही. अर्जास कोणतेही संयुक्तीक कारण नाही. असे असले तरी देखील प्रस्तुत दाव्यामध्ये वादीने प्रतिवादींविरुध्द निरंतर ताकिद मनाई हुकुम मिळावा अशी मागणी केलेली आहे. सदरचा दावा

गुणदोषावर निकाली काढण्याकरिता प्रतिवादीचे म्हणणे अभिलेखावर येणे आवश्यक आहे. प्रस्तुतचा अर्ज मंजुर केल्यास वादीचे कोणतेही अपरिमित नुकसान होणार नाही. याउलट दाव्याचा पुर्णतः निकाल लागण्यास मदत होणार आहे. सबब सदरचा अर्ज मंजुर करणे न्यायाच्यादृष्टीने योग्य ठरेल. त्याचबरोबर प्रस्तुत अर्जामुळे दाव्याच्या कामकाजास झालेला विलंब विचारात घेता सदरचा अर्ज दंडासह मंजुर करणे योग्य व रास्त ठरेल. सबब खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे–

## <u>आदेश</u>

१. प्रतिवादी क्र.४ याच्या विरुध्द झालेला एकतर्फा आदेश दंडासह रद्द करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र.४ याने वादीला दंडापोटी रक्कम रुपये ५००/– (रक्कम रुपये पाचशे फक्त) पुढील तारीख किंवा तत्पुर्वी दयावेत.

३. प्रतिवादी याने वरीलप्रमाणे आदेशाची पुर्तता केल्यानंतर त्यांची कैफियत अभिलेखावर घेण्यात येईल.

SANDHYA YUVRAJ SUL
Digitally signed by SANDHYA YUVRAJ SUL
Date: 2025.07.25 17:32:08 +0530

(संध्या यु. सुळ)
२ रे सह दिवाणी न्यायाधीश,
क.स्तर, नेवासा

ठिकाण– नेवासा
दिनांक २५/०७/२०२५